# २. अन् दयाळ वाचला

दुपारी तीनचा सुमार. रस्त्यावर वर्दळ नव्हती. मी स्कूटरवरून दवाखान्याकडे निघालो होतो. मला ओलांडून एक स्कूटर भरधाव वेगाने पुढे गेली. त्याचवेळी रस्त्याच्या डाव्या बाजूने एक दयाळ पक्षी उडत आला आणि नेमका त्या स्कूटरला धडकला.



तापलेल्या डांबरी रस्त्यावर मधोमध क्षणात कोसळला. मला वाटले खेळ खलास. मी थांबलो. समोर पाहिले, दयाळ निपचित पडलेला होता.

शेजारच्याच बसथांब्यावरील काही माणसे रस्त्यावर पडलेल्या दयाळ पक्ष्याकडे त्रयस्थपणे पाहत उभी होती. त्या माणसांची आणि माझीही थंड अलिप्तता पाहून मला स्वत:चीच शरम वाटली. आणखी काही दयाळ रस्त्यावर उतरलेले होते. तीन कावळे तारेवर बसले होते, पडलेल्या त्या दयाळाचा जणू फडशा पाडण्यासाठीच. ज्या अर्थी कावळ्यांनी अजून दयाळाला उचलले नव्हते, त्या अर्थी दयाळ खरेच मेला आहे किंवा कसे हे पाहण्याची संधी होती. मी दयाळाजवळ गेलो व त्याला हातात घेतले आणि अहो, काय आश्चर्य! दयाळाने हळूच चोच हालवली. मी त्याला रुमालात गुंडाळून माझ्या स्कूटरच्या डिकीत ठेवले आणि दवाखान्यात घेऊन आलो. त्याला चोचीतून औषध पाजले आणि एका छिद्रे असलेल्या हवेशीर पुठ्ठ्याच्या डब्यात ठेवले.

सुमारे दोन तासांनी माझे काम संपले. डब्यात डोकावून पाहिले, तर मला दयाळ पक्षी उभा राहिलेला दिसला. मग मी त्याला घरी घेऊन आलो. रात्री त्याला ग्लुकोजचे पाणी पाजले आणि फळाचा गर खाऊ घातला. रात्रभर दयाळाला छिद्रे पाडलेल्या डब्यातच एका सुरक्षित जागी ठेवले.

सकाळी माझी चाहूल लागताच डब्यातून दयाळाच्या पंखांच्या फडफडाटाचा आवाज कानावर आला. तो आवाज ऐकून मला किती बरे वाटले म्हणून सांगू! खरे तर दयाळाला निसर्गाने मधुर आवाजाची देणगी बहाल केली आहे; पण काल दुपारपासून दयाळ पक्ष्याने एकही लकेर गायली नव्हती.



**शिक्षकांसाठी :** वरील कथेतील प्रसंगासारख्या एखाद्या प्रसंगावर विद्यार्थ्यांना गटात चर्चा करायला लावावी. त्यांना आपले अनुभव सांगण्यासाठी प्रवृत्त करावे.

दयाळाला हातात घेतल्यावर मला त्याच्या पंखांमध्ये ताकद आल्याची खात्री झाली. दयाळाच्या काळ्या-जांभळ्या पंखांवर तेज आले होते. पांढरे पोट स्वच्छ दिसत होते. डोळ्यांत चमक होती. तो मान हालवून कानोसा घेत होता. तो उडून जायला तयार होता. मी दयाळाला अलगद ओंजळीत धरून गच्चीवर आणले. हलकेच ओंजळ उघडली. दयाळ पक्षी सहजपणे उडून समोरच्या शिरीषाच्या झाडावर बसला. जणू त्याला काहीच इजा झाली नव्हती. मग निळ्या आकाशाकडे पाहून दयाळ पक्ष्याने कितीतरी वेळ शिरीषाच्या झाडावर बसून सुरेल गीत आळवले. शुश्रूषा केल्याचे इतके बहुमोल पारितोषिक क्वचितच कोणास प्राप्त झाले असेल!

**– डॉ. सतीश पांडे**

---

**शब्दार्थ : वर्दळ** – रहदारी. **निपचित** – हालचाल न करणे. **शरम वाटणे** – लाज वाटणे. **फडशा पाडणे** – संपवणे, फस्त करणे. **चाहूल लागणे** – समजणे,जाणीव होणे. **बहाल करणे** – मोठ्या मनाने देणे. **कानोसा घेणे** – अंदाज घेणे. **सुरेल** – गोड आवाज. **आळवणे** – पुन्हा पुन्हा म्हणणे. **शुश्रूषा** – सेवा. **बहुमोल** – खूप मूल्य असलेले.

## स्वाध्याय



**प्र. १. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

(अ) लेखक स्कूटरने कोठे निघाले होते?

(आ) रस्त्याने जाताना कोणती घटना घडली?

(इ) माणसे दयाळ पक्ष्याकडे कोणत्या भावनेने पाहत होती?

(ई) तीन कावळे तारेवर कशासाठी बसले होते?

(उ) लेखकाने दयाळला कोठे नेले?

(ऊ) निसर्गाने दयाळला कोणती देणगी बहाल केली आहे?

(ए) दयाळ उडून कोणत्या झाडावर बसला?

**प्र. २. समानार्थी शब्द लिहा.**

(अ) वर्दळ (आ) मधुर (इ) पक्षी (ई) आकाश (उ) झाड

**प्र. ३. विरुद्धार्थी शब्द लिहा.**

(अ) भरधाव × (आ) स्वच्छ × (इ) सुरक्षित × (ई) मधुर ×

**प्र. ४. खालील प्रसंगी तुम्ही काय कराल ?**

(अ) पक्षी/प्राणी जखमी झालेला आढळला.

(आ) दारात कुत्रा थंडीने कुडकुडत आहे.

(इ) एखाद्या वृद्धाला रस्ता ओलांडायचा आहे.

**प्र. ५. खालील शब्दसमूह वाचा. योग्य शब्दसमूह वापरून खालील वाक्ये पुन्हा लिहा.**

(निपचित पडणे, चाहूल लागणे, त्रयस्थपणे वागणे, कानावर येणे, कानोसा घेणे, फडशा पाडणे.)

(अ) कुत्र्याच्या पिलाचा मोडलेला पाय बांधून आणल्यावर तो ........... पडला होता.

(आ) माझा जिवलग मित्र; पण तो सहलीमध्ये माझ्याशी ........... वागत होता.

(इ) गुरुजींनी सांगितलेल्या कामाचा आम्ही ........... पाडला.

(ई) दंगामस्ती करत असलेली मुले शिक्षिका येण्याची ........... लागताच चूप झाली.

(उ) रस्त्यावरील अपघाताची बातमी ........... येताच माणसांचा लोंढा त्या दिशेने जाऊ लागला.

(ऊ) गवतातून जाताना आवाज झाल्याने मी ........... घेत चालत होतो.

**प्र. ६. दयाळ पक्ष्याला सुरेल आवाजाची देणगी लाभली आहे, तसे खालील पक्ष्यांना कशाची देणगी लाभली आहे? शिक्षकांच्या मदतीने माहिती करून घ्या. लिहा.**

(१) मोर (२) पोपट (३) गरुड (४) हंस

**प्र. ७. मुक्या प्राण्यांविषयीचे अनुभव तुमच्या शब्दांत लिहा.**

**प्र. ८. लेखकाच्या हातातून उडून दयाळ शिरीषाच्या झाडावर बसला, तेव्हा त्याच्या मनात लेखकाबद्दल कोणते विचार आले असतील ते कल्पना करून सांगा.**

**उपक्रम :** (अ) वेगवेगळ्या पक्ष्यांवरील कविता शोधा व वर्गात म्हणून दाखवा.

(आ) वेगवेगळे पक्षी, प्राणी वेगवेगळ्या कारणांसाठी एकमेकांशी संवाद साधतात. संवाद साधण्यासाठी ते काय काय करतात याचे निरीक्षण करा. तुम्ही केलेले निरीक्षण वर्गात सांगा.

## आपण समजून घेऊया.

- **खालील रकाने वाचा व शिक्षकांच्या मदतीने समजून घ्या.**

| व्यक्ती | पदार्थ/वस्तू/ठिकाण/वाहन | गुण, भाव |
|---|---|---|
| काका, सोनाली, आजी, माई | घर, बस, रेल्वे, मुंबई, चमचा, पुस्तक, मिठाई | नम्रपणा, चपळता, गोडवा, कष्टाळू, नवलाई, गरिबी |

**वरील रकान्यांतील सर्व शब्द नामे आहेत. व्यक्ती, वस्तू, पदार्थ, गुण, भाव यांच्या नावांना 'नाम' असे म्हणतात.**

- **खालील वाक्यांतील 'नामे' ओळखा. त्यांखाली रेघ ओढा.**

(अ) आजी, मंजू कुठे गेली?

(आ) दिनेशमध्ये प्रामाणिकपणा आहे.

(इ) वृद्धांना नेहमी मदत करावी.

(ई) दारावरची बेल वाजली.

- **खालील वाक्यांत योग्य नामे लिहा.**

(अ) ........... माझा जिवलग मित्र आहे.

(आ) माझ्या दप्तरात ..........., ..........., ........... या वस्तू आहेत.

(इ) ........... मधून बाहेर थुंकू नये.

C9D4H3

- **वाचा.**

**घेऊ काळजी पशू आणि पक्ष्यांची,**
**जाणीव ठेवूया पर्यावरण समतोलाची.**

**दाणे देऊ, पाणी ठेवू, काळजी घेऊ पक्ष्यांची,**
**झाडे लावू, झाडे वाढवू, सोय होईल निवाऱ्याची.**